लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,
धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०८८७००/२२०८८७००
Email: scc-mumbai@bhc.gov.in

## दरपत्रक सुचना

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ येथील मुख्य कार्यालयातील जुनी व नविन इमारतीमधील न्यायालयीन कक्ष, न्यायाधीश दालने, विभाग व इतर ठिकाणी बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा भरणा संपलेला आहे. त्यामुळे अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा भरणा करणे आवश्यक आहे.

या न्यायालयातील अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr. No. | Description of Articles | No. of Fire Extinguishers |
|---|---|---|
| 1. | Refilling of Dry Chemical Powder 6 kg Type Fire Extinguishers | 115 |
| 2. | Refilling of Dry Chemical Powder 9 kg Type Fire Extinguishers | 10 |
| 3. | Refilling of Water Co2 9 Liters Type Fire Extinguishers Stored Type. | 32 |
| 4. | Refilling of Dry Chemical Powder A.B.C. 5 Kgs. Type Fire Extinguisher | 03 |
| | Total :- | 160 |

तरी इच्छुक ठेकेदारांनी आपले दरपत्रक **मोहोरबंद लखोटयात** त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात "Quotation for Refilling of Fire Extinguishers" असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ "** यांच्याकडे दरपत्रक सूचना प्रसिद्ध केल्यापासून **दिनांक २९ एप्रिल, २०२४ पर्यंत दुपारी २.००** वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती शासनाच्या **http://www.bombayhighcourt.nic.in** व **http://sccmumbai.dcourts.gov.in** या संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत.

लघुवाद न्यायालय, }
}
मुंबई :- ८ एप्रिल, २०२४ }

(निलम शाहीर)
प्रबंधक

## लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई – ४०० ००२.

## जाहीर सुचना

**या न्यायालयाच्या जुन्या व नविन इमारतीमध्ये निकामी झालेल्या अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायु/ रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी जाहीर दरपत्रकाची प्रक्रिया अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | दरपत्रकाधारकाने/संस्थेने महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, (Directorate of Maharashtra Fire Services) मुंबई, एच. बी. मार्ग, कोलीवरीगांव, यशवंत नगर, कलिना, सांताक्रुझ, पूर्व, मुंबई - ४०० ०९८ या अंतर्गत नोंदणीकृत परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| २. | दरपत्रकाधारकाने/संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रत, सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. क्रमांक, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील निविदासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकीटावर ठळक अक्षरात नमूद करावे. |
| ३. | दरपत्रकधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी अग्निशमन उपकरणांमध्ये वायु/रसायन भरणा केलेला आहे, त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | दरपत्रकाधारकाने/संस्थेने दरपत्रक हे विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात **"अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायु/रसायन भरणा करण्यासाठी दरपत्रक"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई – ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक २९ एप्रिल, २०२४ पर्यत दुपारी २.०० वाजेपर्यत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. |
| ५. | निश्चित केलेल्या दरपत्रकाधारकाने/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी **कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर** सदरचे देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे. |
| ६. | दरपत्रक शुल्क (Tender Fees INR) रक्कम म्हणून रुपये १,७००/- (रुपये एक हजार सातशे फक्त) (विनापरतावा) व बयाना रक्कम (EMD INR) म्हणून रुपये ८,५००/- (रुपये आठ हजार पाचशे फक्त) (परतावा व्याजरहित) चे धनाकर्ष (Demand Draft) दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहेत. **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई – ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष सोबत दिलेले नसतील तर सदर दरपत्रक स्विकारले जाणार नाही. जे दरपत्रक स्विकारले जाईल त्यांची बयाना रक्कम करार संपेपर्यत ठेवण्यात येईल व इतर दरपत्रकाधारकांची बयाना रक्कम परत करण्यात येईल. (दरपत्रक फी रक्कम व बयाना रक्कम धनाकर्षाद्वारे (Demand Draft) दरपत्रकासोबत दयावयाचे आहेत.) |

| | |
|---|---|
| ७. | सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम - २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. परंतु सदरचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. तसेच ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरावी लागेल. |
| ८. | जाहीर सुचना ह्या संबंधीत समितीच्या निर्णयानुसार ठरावीक दिवशी या न्यायालयाच्या संबंधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकाधारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या दरपत्रकाधारकांची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. दरपत्रकाधारकांनी सदर दिवशी समितीच्या बैठकीत आपल्या दरपत्रकेत नमूद केलेल्या अग्निशमन उपकरणांचे नमूने वस्तू (Sample Fire Extinguisher) पडताळणीसाठी या कार्यालयात घेवून येणे बंधनकारक राहील. |
| ९. | १६० अग्निशमन उपकरणांमध्ये वायू/रसायनांचा भरणा करावयाचा असल्याने सदरची रक्कम तपशीलवार दरपत्रकांमध्ये दाखल करावयाची आहे. |
| १० | दरपत्रकधारकाने/संस्थेने जाहीर सुचनेत सर्वात कमी रक्कमेची दरपत्रके दाखल केलेली असतांना वस्तूची गुणवत्ता योग्य प्रकारे नसल्याचे आढळून आल्यास खरेदी समितीकडून त्या ऐवजी त्यांच्या पुढील क्रमवारीनुसार दरपत्रकाधारक/संस्थेची निवड करण्यात येईल तसा अधिकार खरेदी समितीला असणार आहे. |
| ११. | दरपत्रकधारक सहभागी दरपत्रक प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर जाहीर दरपत्रकातून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १२. | दरपत्रक हे दरपत्रकधारकांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या समोर उघडले जातील. त्यावेळी हजर नसलेल्या दरपत्रकधारंकाची व त्यांच्या प्रतिनिधीची कुठलीही तक्रार नंतर ऐकली जाणार नाही. दरपत्रक उघडले जातील ती तारीख दरपत्रकधारकास दरपत्रक उघडण्यापूर्वी कळविण्यात येईल. |
| १३. | मा. मुख्य न्यायाधीश साहेब यांना जाहीर दरपत्रक प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. |

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
दिनांक: ८ एप्रिल, २०२४ }

(निलम शाहीर)
प्रबंधक